MHKO180001002026

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४९/२०२६**

**:: न्या य नि र्ण य ::**

**निशाणी क्र.०८ लगत**

**महाराष्ट्र सरकार वि. भारत रामदास जगताप.**

(अधिघोषित दिनांक १९.०५.२०२६)

अभियोगपक्षातर्फे विद्यमान विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती आ.वि.मोरे व आरोपीतर्फे विद्यमान वकील श्री. मो.सि.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थीत झालेले मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे :–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | घटनेवेळी आरोपी दारुसारखे मादक पदार्थाचे सेवन करुन त्याच्या ताब्यातील ट्वीस्टर मोटरसायकल क्र.एम.एच.–०९/डी.–४४७७ ही सार्वजनिक रस्त्यावर चालवित होता, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच मोहन शांतीनाथ माणगावे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०८ लगत नोंदविली आहे. त्यानंतर, अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार पोलीस शिपाई अविनाश सर्जेराव भोसले, तपासीक अंमलदार ज्ञानदेव दिनकर सानप, घटनास्थळ पंचनामा करणारे पोलीस हवालदार विवेक महादेव कराडे, संबंधीत वैद्यकिय अधिकारी व उर्वरीत साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदवली नाही. त्यामुळे, निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीस प्रस्तुत गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नाही. सबब, आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

:: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र. १ करीता :-**

०४. पंच मोहन यांनी दिनांक ३१.१२.२०२५ रोजी पोलीसांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. पंच मोहन हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोगपक्षाने न्यायालयाच्या परवानगीने पंच मोहन यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतू, पंच मोहन यांच्या साक्षीपुराव्यामधुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना व घटनास्थळ पंचनामा सिध्द करता आले नाहीत.

०५. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार, तपासीक अंमलदार सानप, घटनास्थळाचा पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार कराडे, दुसरे पंच शरद यशवंत पवार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पोलीस शिपाई किशोर परशराम माळी आणि संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आला नाही. तसेच, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे आणि पोलीस हवालदार कराडे व पंच शरद यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास घटनास्थळ पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. घटनेवेळी आरोपी दारुच्या नशेत होता, ही बाब संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष अभिलेखावर नोंदविणे आवश्यक होते. परंतु, अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. त्यामुळे, अभिलेखावरील वैद्यकीय प्रमाणपत्र अभियोगपक्षास सिध्द करता आले नाही. यामुळे, घटनेवेळी आरोपी दारुच्या नशेत होता, ही बाब अभियोगपक्षास संशयापलीकडे सिध्द करता आली नाही.

०७. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच मोहन यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे तसेच, तक्रारदार, तपासीक अंमलदार सानप,

घटनास्थळाचा पंचनामा तयार करणारे पोलीस हवालदार कराडे, दुसरे पंच शरद यशवंत पवार, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पोलीस शिपाई किशोर परशराम माळी आणि संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता** :–

०८. अभियोगपक्षाचा एकुण साक्षीपुरावा आहे असा जरी वाचला तरी आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देवून त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## :: आ दे श ::

१. आरोपी भारत रामदास जगताप यांची मोटर वाहन अधिनियम कलम १८५ या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कद्बे रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी सहा महिने कालावधीकरीता रक्कम रुपये १५,०००/– किंमतीचे वैयक्तीक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचे एका जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.05.19 15:22:19 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

दिनांक : १९.०५.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.